पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd-1962
NAAC 'A' Grade

## शोध समिती,

## 'कुलगुरू' या पदासाठी अर्ज मागवीत आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची स्थापना १९६२ साली झालेली असून हे पश्चिम महाराष्ट्रातील विद्यापीठांपैकी एक विद्यापीठ आहे. ह्या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रात कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांचा समावेश आहे. हे विद्यापीठ ८५३ एकर क्षेत्रात पसरलेले आहे. या विद्यापीठांतर्गत २९६ संलग्नित महाविद्यालये असून सुमारे अडीच लक्ष पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठात ४० विविध शैक्षणिक विभाग असून कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण, सामाजिक विज्ञान, औषधनिर्माणशास्त्र आणि अभियांत्रिकी अशा विविध शाखेतून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर नॅनो सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, सोशल वर्क, रूरल स्टडीज इत्यादी नवीन अभ्यासक्रम सुरू केलेले आहेत. सर्व विद्याशाखांमध्ये विद्यापीठाने निवड आधारित श्रेणांक पध्दतीचे (Choice Based Credit System) अवलंबन केले असून परीक्षा पध्दतीमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा समावेश करून सुधारणा केलेल्या आहेत. विद्यापीठाने विविध राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत. हे प्रतिष्ठित विद्यापीठ नॅक (NAAC) द्वारे 'ए' श्रेणीसह पुन:अधीस्वीकृत केले आहे. नुकतेच या विद्यापीठाने ISO 9001:2015 मानांकन प्राप्त केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये कुलगुरू निवडीसाठी पारदर्शी व वस्तुनिष्ठ पध्दतीची तरतूद करण्यात आली आहे. जी व्यक्ती विद्यापीठाचे रूपांतर एका शैक्षणिक व व्यावसायिक श्रेष्ठत्व केंद्रात करू शकेल असे उत्तम नेतृत्वगुण आणि प्रशासन कौशल्य असलेल्या ज्येष्ठ विद्याव्यासंगीची निवड करण्यासाठी या अधिनियमाची रचना करण्यात आली आहे.

कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल यांनी या विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी यथोचित व्यक्तीची शिफारस करण्यासाठी त्रिसदस्यीय शोध समिती तयार केली आहे. ही शोध समिती दिनांक २७ मे, २००९ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रानुसार कुलगुरूंच्या पदासाठी विहित केलेली अर्हता व अनुभव या अटींची पूर्तता करणाऱ्या तसेच, हे आव्हानात्मक काम करण्यास इच्छुक असलेल्या ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञांकडून नामनिर्देशने/निवेदन मागवीत आहे. या पदासाठी आवश्यक अर्हता व अनुभव, इष्टतम अनुभव आणि कौशल्ये व नैपुण्य याबाबतची आवश्यक ती तपशीलवार माहिती तसेच, अर्जाचा नमूना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या www.unishivaji.ac.in. या संकेतस्थळावर दिला आहे.

इच्छुक व्यक्तींनी आपला तपशीलवार गोषवारा, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमून्यात त्यांच्या/तिच्या उमेदवारीबाबतचे दोन पानी समर्थन, विद्यापीठाकरिता दोन पानी भविष्यलक्षी योजना (Vision) आणि त्यांच्या/तिच्या कार्याची नीट ओळख असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे/संपर्क माहितीसह सादर करावा. संस्थांना सुध्दा त्यांना योग्य वाटेल अशा उमेदवारांची नामनिर्देशने पाठवीता येतील.

शोध समितीने **श्री. आर. के. जैन, सायन्टिस्ट 'एफ'** यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

संबंधित उमेदवारांनी त्यांचा अर्ज/ नामांकन विहित नमून्यात चार प्रतीत व त्याच सोबत संगणकीकृत प्रत (Soft Copy) संपर्क अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०२ जुलै, २०२० रोजी** किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा रीतीने खालील पत्यावर पाठवावीत. त्यानंतर आलेले अर्ज/ नामांकन विचारात घेतले जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| ई-मेल | : **rk.jain67@gov.in** |
| पत्ता | : अ‍ॅडीशनल डायरेक्टर, डायरेक्टॉरेट ऑफ एच.आर.डी.<br>रूम नं. २४८, डी. आर. डी. ओ. भवन, न्यू दिल्ली - 110011 |
| भ्रमणध्वनी क्रमांक | : 09717700664 |
| दूरध्वनी क्रमांक | : 011-23007248 |

आवश्यकता भासल्यास शोध समिती, निवड सूचितील उमेदवारांना विचारांच्या आदान-प्रदानासाठी आमंत्रित करेल.

या माध्यमातून नवनवीन उपक्रम व संशोधन प्रकल्प राबवून संस्थेला उत्तुंग शिखरावर नेण्याची तसेच, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याची ही शैक्षणिक प्रशासकांना सुवर्ण संधी आहे.

दिनांक : 03/06/2020

**अध्यक्ष,**
शोध समिती

# शिवाजी विद्यापीठाच्या नव्या कुलगुरूंचा शोध सुरू

» पान १ वरून

संचालक डॉ. अश्विनीकुमार नांगिया हे या शोध समितीमधील एक सदस्य आहेत. त्यांच्यासह व्यवस्थापन परिषद आणि विद्यापरिषदेने नियुक्त केलेला एक सदस्य आणि राज्यपालांनी नियुक्त केलेला सदस्य अशी तीन जणांची समिती आहे. या समितीची पहिली बैठक झाली असून, आता प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरवात झाली. यामध्ये समितीने देशातील पात्र व्यक्तींनी कुलगुरू पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. शोध समितीने शासनाच्या राजपत्रानुसार कुलगुरुंच्या पदासाठी विहीत केलेली अर्हता व अनुभव या अटींची पूर्तता करणे अर्जदाराला बंधनकारक आहे. याबाबतची सर्व माहिती www.unishivaji.ac.in. या संकेतस्थळावर दिली आहे. इच्छुकांनी तपशीलवार घोषवारा, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर असलेल्या नमुन्यात उमेदवारीच्या समर्थनार्थ दोन पानी पत्र, भविष्यलक्षी योजनांची माहिती, अर्जदाराच्या कार्याची तपशीलवार माहिती असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे, संपर्क माहितीसह सादर करणे बंधनकारक आहे. २ जुलैपर्यंत अर्ज येणे बंधनकारक असून, त्यानंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याचे निवेदनात म्हटले आहेत. केंद्रीय मनुष्यबळ संचालनालयाचे अतिरिक्त संचालक आर. के. जैन यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

**प्रभारी कुलगुरूंकडे पदभार**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत १७ जून रोजी संपणार आहे. त्यानंतर कुलगुरू पदाचा पदभार प्रभारी कुलगुरुंकडे देण्यात येईल. प्रभारी कुलगुरुंची निवड राज्यपाल करतात.

कोरोनाची पार्श्वभूमी लक्षात घेऊन राज्यपाल अन्य विद्यापीठाच्या कुलगुरुंपेक्षा स्थानिक व्यक्तींची प्रभारी कुलगुरू म्हणून नियुक्ती करतील, अशी शक्यता आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या नव्या कुलगुरूंचा शोध सुरू

## पात्रताधारकांना अर्ज करण्याचे आवाहन



**कोल्हापूर, ता. २** : शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची १७ जूनला मुदत संपत आहे. त्यामुळे नव्या कुलगुरूंची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, त्यासाठी तीन सदस्यांची नियुक्ती केली आहे. या समितीने कुलगुरू पदासाठी पात्रताधारकांनी अर्ज करावा, असे आवाहन करणारे निवेदन प्रसिद्ध केले आहे. २ जुलै ही अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार कुलगुरूंची निवड केली जाते. अधिनियमानुसार शोध समिती स्थापन केली आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे

**पान ८ वर »**

पुढारी

# विद्यापीठात अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. अवनिश पाटील आदी उपस्थित होते.

My Kolhapur Edition
3 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

# विद्यापीठात विषाणू तपासणी प्रयोगशाळेस १.४० कोटी निधी खर्चास परवानगी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील प्रस्तावित विविध रोगांवरील विषाणू तपासणी प्रयोगशाळा निर्मितीसाठी विद्यापीठाच्या आपत्ती व्यवस्थापन निधीतून १ कोटी ४० लाख रुपये खर्चास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. याबाबतचे पत्र नुकतेच विद्यापीठास प्राप्त झाले आहे.

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने कायमस्वरूपी विषाणू तपासणी प्रयोगशाळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात कोणत्याही साथीच्या आजाराचे निदान करण्यासाठी चाचण्या करता येतील, यादृष्टीने विद्यापीठात प्रयोगशाळेची उभारणी केली जाणार आहे. त्यानुसार विद्यापीठाने जिल्हा प्रशासनास फेरप्रस्ताव पाठविला. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी कुलगुरूंच्या बैठकीत आपत्ती व्यवस्थापन निधीतून विद्यापीठांमध्ये या प्रयोगशाळा तयार करण्याचे निर्देश दिले होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंची निवड प्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची निवड प्रक्रिया मंगळवारी सुरु झाली. या पदासाठी योग्य व्यक्तीची शिफारस करण्यासाठी कुलपतींनी त्रिसदस्यीय शोध समिती तयार केली आहे. या समितीतर्फे अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्ज करण्याची मुदत दि. २ जुलैपर्यंत आहे. निवड प्रक्रियेसाठी केंद्रीय मनुष्यबळ संचालनालयातील अतिरिक्त संचालक आर. के. जैन यांची नियुक्ती केली आहे. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत दि. १७ जूनला संपणार आहे.

कुलगुरुंच्या पदासाठी विहित केलेली अर्हता, अनुभव या अटींची पूर्तता करणाऱ्या तसेच हे काम करण्यास इच्छुक असलेल्या ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांनी त्यांचा अर्ज विहित नमुन्यात चार प्रतींत आणि त्याचसोबत संगणकीकृत प्रत संपर्क अधिकारी यांच्या (rk.jain67@gov.in) ई-मेलवर आणि अतिरिक्त संचालक, केंद्रीय मनुष्यबळ संचालनालय, खोली क्रमांक २४८, डीआरडीओ भवन, नवी दिल्ली-११००११ या पत्त्यावर पाठवावेत असे आवाहन शोध समितीने केले आहेत.

## ही माहिती सादर करावी लागणार

इच्छुकांनी त्यांची वैयक्तिक माहिती, विहित नमुन्यात उमेदवारीबाबतचे दोन पानी समर्थन, विद्यापीठाकरिता दोन पानी भविष्यलक्षी योजना, कार्याची नीट ओळख असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे, संपर्क ही माहिती अर्जासमवेत सादर करावयाची आहे.